**नियमित फौजदारी खटला क्र. १६१/२०२३**
**निशाणी क्र. ६८/क**

## सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ६ ची जबानी

| | |
|---|---|
| माझे नांव | - मिनाज कमाल पटवेगार |
| वय वर्षे | - ३५ |
| नोकरी | - घरकाम |
| राहणार | - वाठार स्टॅन्ड जवळ, वाठार, ता.हातकणंगले जि.कोल्हापूर |

### सरतपास सरकारी वकील श्री.व्ही.पी.कुसुरकर यांच्यातर्फे -

दि.०५/०२/२०२३ रोजी सकाळी ८.३० च्या सुमारास घटना घडली होती. माझे शिक्षण ४ पर्यंत झालेले आहे. माझे पती कमाल पटवेगार सकाळी ८.३० च्या सुमारास दुकाण उघडण्यासाठी जात असताना सुरज नदाफ ने त्यांना मारहाण करायला सुरुवात केली होती. त्यावेळेस जाधव पान शॉपचे मालक व माझा मुलगा भांडण सोडविण्याकरीता गेले होते. माझ्या मुलांचे नाव मौहम्मद जैद असे आहे. घटना माझ्या घरासमोर झाली होती. त्यावेळेस तेथे जोया नदाफ व आलिया नदाफ तेथे माझ्या पतीला मारण्याकरीता तेथे गेले होते. त्यांनी माझ्या पतीला शर्टने पकडून बुक्कीने मारले होते. मग तेथे तबसुम नदाफ आली व तीने माझ्या पतीला स्टीलच्या काठीने डोक्यावर, खांदयावर व पायावर मारले. मग तेथे फजल नदाफ आला व त्यानेही माझ्या पतीला शर्टने पकडून तोंडावर बुक्कीने मारले. तेथे उपस्थीत असलेल्या लोकांनी फजलला बाजूला केल्यावर त्यांने तेथे पडलेली वीट उचलली व माझ्या पतीला मारायला गेले असता माझा मुलगा जैद मध्ये आल्यामुळे त्याच्या हाताला लागले होते. मग अनारकली नदाफ चप्पल घेऊन मारायला आली असता तीला उपस्थीत असलेल्या लोकांनी बाजूला केले. शकील नदाफने माझ्या घरावर दगड फेकले होते. मी घरात असताना त्याने ''तु बाहेर ये तुला जाळून टाकतो, मारुन टाकतो '' अशी धमकी दिली. मी बाहेर अंथरुण वाळत घातले होते ते अनारकली व शकील नदाफ ने ते खाली पाडून ते विसकटून टाकले. मी आरोपींना पाहील्यास ओळखू शकते. कोर्टात शकील नदाफ, अनारकली नदाफ, आफिया नदाफ, फजल नदाफ हजर आहे. आता मला चप्पल MO 2 दाखविण्यात आले. ती तीच चप्पल आहे. ज्याच्याने अनारकली नदाफने माझ्या पतीला मारले होते. आता मला MO1 आणि MO3 दाखविण्यात आले. ते तेच स्टील पाईप व सिमेंटचे वीट आहे. ज्याच्याने माझ्या पतीला मारले होते. आता मला दि.०२/०५/२०२३ रोजीचा व्हीडीओ दाखविण्यात आला. २७ सेकंडच्या व्हीडीओमध्ये माझे पती कमाल पटवेगार बाहेर जात

असताना दिसत आहे. ३५ सेकंदच्या व्हीडोआमध्ये सुरज नदाफ माझ्या पतीला मारहान केल्याचे दिसत आहे. त्याने लाल रंगाचे शर्ट घातला आहे. ४४ सेकंदच्या व्हीडीओमध्ये जाधव पान शॉपचे मालक व माझा मुलगा जैद भाडण सोडविण्याचा पयत्न करत आहे. ५४ सेकंदच्या व्हीडीओमध्ये जोया नदाफ आणि आफीया नदाफ आल्याचे दिसत आहे. १ मिनिट आणि १४ सेकंदच्या व्हीडीओमध्ये तबसूम नदाफ काठी घेऊन माझ्या पतीला मारहाण करत असल्याचे दिसून येत आहे. १ मिनिट २१ च्या सेकंदच्या व्हीडीओमध्ये फजल नदाफ तेथे आला आहे व माझ्या पतीला त्याने तोंडावर मारले आहे. १ मिनिट २७ च्या सेकंदच्या व्हीडीओमध्ये फजल नदाफ ने वीट उचलून माझे पतीच्या दिशेने फेकली होती. १ मिनिट ४८ च्या सेकंदच्या व्हीडीओमध्ये अनारकली चप्पल घेऊन मारण्यासाठी आल्याचे दिसून येत आहे. २ मिनिट २ सेकंदच्या व्हीडीओमध्ये अनारकली परत माझ्या पतीस मारण्यास आल्याचे दिसून येत आहे. २ मिनिट ३८ सेकंदच्या व्हीडीओमध्ये माझे पती व मुलगा व इतर सर्वजण तेथून निघून गेल्याचे दिसून येत आहे.

**सरतपास संपला.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.डी.पी.पाटील यांच्यातर्फे -</u>**

माझ्या घराच्या पश्चिमेस रस्ता आहे किंवा कसे हे मला कळत नाही. साक्षीदार स्वतहून सांगतो पश्चिमेस रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराला लागून दक्षिणेस दत्त भेल चे दुकान आहे. हे म्हणणे खरे आहे की, दक्षिणेस आरोपीचे घर आहे. परंतू त्याच्या पलीकडे गोडावून आहे किंवा कसे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, गोडावून च्या समोर कोडोली अर्बन बॅंक आहे. कोडोली अर्बन बॅक ते माझे घर मधील अंतर अंदाजे १०० फुट आहे किंवा कसे हे मला माहीत नाही. कोडोली अर्बन बॅक रस्त्याच्या पश्चिमेस आहे किंवा कसे हे मला माहीत नाही. घटनास्थळ हे रस्त्याच्या बरोबर मध्ये होते. घटनास्थळ माझ्या घरासमोर अंदाजे १० फुटावर आहे.

हे म्हणणे खरे नाही की, आमचे स्वतचे दुकान नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती ज्युसचा गाळा चालवतात व तो दुकान गाळा त्याच्या स्वतचा नाही. घटनेच्या ठिकाणी आरडा ओरड झाली होती. आलिया व जोया नदाफ यांनी माझ्या पतीला समोरुन मारले होते. माझ्या पतीला स्टीलच्या पाईपने समोरुन मारले होते. माझ्या पतीवर स्टीलच्या पाईपने तीन वार झाले होते. माझ्या पतीला मारहाणीमध्ये रत्काची एक जखम झाली होती. साक्षीदार स्वतहून सांगतो की, त्याच्या पूर्ण चेहरा लाल झाला होतो. घटनास्थळी रक्त पडले

नव्हते. माझ्या पतीच्या शर्टावर रक्ताचे डाग नव्हते. भांडणामुळे माझ्या पतीचे शर्ट व बनीयन फाटले होते. सरतपासामधील सांगीतलेली घटना ही एका टप्प्यामध्ये घडली होती.

आमचे घर कौलारु आहे. घटनतील दगड फेकमुळे आमच्या घराच्या दाराचे आणि कौलारु रुफचे नुकसान झाले होते. आमच्या घराच्या समोर आमचे दुकान आहे. अंथरुण मी आमच्या दुकानाच्या पाठीमागे वाळायला टाकले होते. घटनेमुळे अंथरुणाचे नुकसान झाले होते. वाद हे अंदाजे अर्ध्या तास चालू होते. घटना घडल्यानंतर माझे पती व मुलगा घरामध्ये आले नव्हते. माझ्या मुलाला घटनेमुळे रक्ताची एक जखम झाली होती. घटनेमुळे जैदचे कपडे फाटले नव्हते तसेच त्यावर रक्तांचे डागही नव्हते. माझे पतीचे पाकीट घटनेनंतर घटनास्थळी पडलेले होते. इतर कोणतेही खाणा-खुणा घटनास्थळी नव्हते.

घटना घडल्यानंतर आम्ही पोलीस स्टेशनमध्ये ९ च्या सुमारास गेलो होतो. पोलीस स्टेशनला मी, माझे पती व माझा मुलगा गेलो होतो. पोलीस स्टेशनमध्ये गेल्यानंतर त्यांना घटनेची माहीती सांगीतली होती. पोलीस स्टेशनमध्ये घटनेबाबतची माहीती लिहून घेतलेली होती. पोलीसांनी माझी सही घेतली होती. पोलीस स्टेशनमध्ये आम्ही अंदाजे १ तास थांबलो होतो. त्यानंतर आम्ही घरी १२ च्या आसपास आलो होतो. घटनेच्या दिवशी पोलीस घटनेच्या ठिकाणी आले होते. पोलीसांनी घटनास्थळी पंचनामा केला होता. पोलीसांनी पुन्हा आम्हाला अंदाजे २१ दिवसानंतर पोलीस स्टेशनला बोलावले होते. पोलीसांनी या केसच्या अनुषंगाने माझा जबाब घेतला होता.

मी पोलीसांना जबाब देताना सांगीतले होते की, मी बाहेर अंथरुण वाळत घातले होते ते अनारकली व शकील नदाफ ने ते खाली पाडून ते विसकटून टाकले. फजल नदाफ ने वीट उचलून माझ्या पतीच्या दिशेने टाकल्या बाबतचे व माझा मुलगा मधी आल्यामुळे त्याला लागले होते हे मी पोलीसांना सांगीतले होते. सदरचा मजकूर माझ्या जबाबामध्ये का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, चप्पल, वीट व स्टीलची काठी माझ्या पतीने पोलीसांना सादर केले होते व ते पोलीसांनी जप्त केले होते.

हे म्हणणे खरे नाही की, मला दाखविलेल्या व्हीडीओमधील चेहरे मी ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, व्हीडीओमध्ये आरोपीचे चेहरे दिसत नाही. हे म्हणणे खरे आहे की, व्हीडीओमध्ये मी दिसत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासामधील मजकूर व्हीडीओमध्ये दिसत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या घरावर दगड फेक केली व अंथरुण विसकटून टाकले हे व्हीडीओमध्ये दिसत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला

दाखविलेला व्हीडोओ हा Original नसून Edited आहे. हे म्हणणे खरे आहे की, सरतपासामध्ये मला दाखविलेल्या व्हीडीओचा घटनाक्रम व तो पाहून मी पहील्यांदा कोर्टामध्ये सांगत आहे. सदरचा व्हीडीओ पोलीस स्टेशनमध्ये पोलीसांनी मला दाखविला होता. पोलीस स्टेशनमध्ये व्हीडीओ पाहील्यानंतर मी पोलीसांना व्हीडीओमधील घटनेचा क्रम सांगीतला होता किंवा कसे हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला दाखविलेला संपूर्ण व्हीडीओ हा खोटा आहे.

हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमच्यामध्ये प्रॉप्रटी संदर्भांत आधीपासून वाद होता. माझ्या पतीने आरोपीविरुध्द व आरोपींनी माझ्या पतीविरुध्द वडगांव पोलीस स्टेशन येथे तक्रारी दाखल केलेले होते किंवा कसे हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी स्थावर मिळकतीला माझे पती हरकत घेत असल्यामुळे वारंवार वडगांव पोलीस स्टेशन येथे तक्रार अर्ज केला आहे तसेच वडगांव कोर्टात दिवाणी दावा चालू आहे.

हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने आरोपींवर दबाव टाकण्याकरीता खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, पतीला मदत करण्यासाठी मी पोलीस स्टेशनमध्ये व आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझ्या पतीला व मला कधीही मारहाण, शीवीगाळ व धमकी दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासामधील संपूर्ण मजकूर खोटा व चूकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

श्रवणोत्तर स्वीकृती,

Sd/-

(आर.एस.मोरे)

दि. १८/०२/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठ वडगाव